# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 26.08.2014 रोजी (का.प.क्रं.-05) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 26/08/2014 (का.प.क्रं.-05) रोजी मा.सभापती **श्री.विजय वाघचौरे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 3.00 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव, श्री.प्रमोद का.खोब्रागडे यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
09. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
10. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
11. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
12. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
13. स.स.सौ.ऊर्मिला नितीन चित्ते
14. स.स.श्रीमती परवीन कैसर खान

श्री.त्रिंबक तुपे :विनंती करण्यात येते की, विषय पत्रिका घेण्यात यावे. महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती :स.सदस्यांनी सूचविल्यानुसार विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**<u>विषय क्र. 47</u> : <u>मालमत्ता विभाग</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मोहल्ला पैठणगेट येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र. एन-19 भाडेतत्वावर मिळणेसाठी श्री.मोहम्मद इकबाल मो.सुभान यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 9.18 चौमी एवढे आहे. या दुकानाकरीता सन 2014 च्या शिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसार प्रतीमाह भाडे रू.2450/- (अनामत रक्कम, सेवाकर, सेवाशुल्क व इतर कर वेगळे) एवढे होते. सदरील दरास व अर्जदाराचे मागणीस प्रशासकीय मान्यता झाली असून उक्त भाडे दराने सदर दुकान क्र.एस-19 नेहमीच्या इतर अटी शर्तीस अधिन राहुन तीन वर्षाचे कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : विषय क्रमांक 47 मंजूर.

श्री.मीर हिदायत अली :सदर अर्ज प्राप्त झालेला आहे अपंग असल्याकारणाने काही सवलत देण्यात यावी.

श्री.त्रिंबक तुपे :अपंगासाठी वेगळी तरतुद असल्यास करण्यात यावे. काही सवलत असल्यास देण्यात यावे.

मा.सभापती :प्रशासनाने या विषयामध्ये नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मोहल्ला पैठणगेट येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र. एन-19 भाडेतत्वावर मिळणेसाठी श्री.मोहम्मद इकबाल मो.सुभान यांनी विनंती केल्यानुसार प्रतीमाह भाडे रू.2450/- (अनामत रक्कम, सेवाकर, सेवाशुल्क व इतर कर वेगळे) आकारणी करून सदर दुकान क्र.एस-19 नेहमीच्या इतर अटी शर्तीस अधिन राहुन संबंधीतास भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 48 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.35 अंतर्गत बारापुल्ला रोडवरील शौचालयाची आवश्यकता नसल्याबाबत वार्ड अधिकारी, वार्ड-अ यांचे प्राप्त अभिप्राय संदर्भाने सदरील वार्डचे स.सदस्य यांनी सदरील शौचालय निष्काशीत करून या जागेवर आरोग्य केंद्र बांधणेची मागणी केली आहे. सदरील शौचालय हे 10x6 मीटर जागेवर असून सहा बैठकी शौचालय (03 पुरूष बैठका व 03 स्त्री बैठका) आहेत. सदर शौचालयाची आवश्यकता नसल्याचे अभिप्राय पाहता या ठिकाणी देय वापरा संबंधाने अनुज्ञेय होणारे बांधकाम करता येईल यास अधीन राहुन बारापुल्ला रोडवरील वर नमुद शौचालय निष्काशीत करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 48 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.35 अंतर्गत बारापुल्ला रोडवरील शौचालयाची आवश्यकता नसल्याबाबत वार्ड अधिकारी, वार्ड-अ यांचे प्राप्त अभिप्राय संदर्भाने सदर शौचालयाची आवश्यकता नसल्याचे अभिप्राय पाहता या ठिकाणी देय वापरा संबंधाने अनुज्ञेय होणारे बांधकाम करता येईल यास अधीन राहुन बारापुल्ला रोडवरील वर नमुद शौचालय निष्काशीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 49 : बीओटी विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करणेसाठीच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 340, दिनांक 20/11/2008 अन्वये मंजुरी प्राप्त झाली असून मराठवाडा विकास कार्यक्रम 2007 आणि महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सदर प्रकल्प पुर्ण करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक 02/07/2014 रोजी सदर सरोवराचे उद्‌घाटन समारंभ संपन्न झालेला असून दिनांक 03/07/2014 पासुन सदर सरोवर हे नागरीक/पर्यटकांसाठी खुले करण्यात आलेले आहे.

सदर सरोवर हे सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीमध्ये नागरीक/पर्यंटकांसाठी खुले असून सिध्दार्थ उद्यानाच्या धर्तीवर प्रवेश शुल्क हे प्रति व्यक्ती रूपये 10/- आकारण्यात आले आहे. या ठिकाणी शहरातील नागरीकांचा व पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळत असुन सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात गर्दी जमा होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर सरोवरामध्ये येणाऱ्या नागरीक/पर्यंटकांसाठी प्रति व्यक्ती रूपये 10/- असे प्रवेश शुल्क आकारण्यात आलेले असून नागरीकांचा व पर्यटकांचा प्रतिसाद पाहता महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणेसाठी प्रवेश शुल्क हे रूपये 10/- ऐवजी रूपये 30/- प्रति व्यक्ती व लहान मुलांसाठी (10 वर्षापेक्षा कमी वय) प्रत्येकी रूपये 10/- असे प्रवेश शुल्क आकारणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

श्री.त्रिंबक तुपे :मागील तलावात मृत्युच्या घटना घडलेल्या आहे. तारेचे कुपणाचे काम करण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली :सलीम अली सरोवर चांगले वास्तु आहे 30 रूपये ठेवण्यात येऊ नये. दर कमी करण्यात यावे. तेथील कामे होईपर्यंत सलीम अली सरोवर बंद करण्यात यावे. काही अपरिहार्य घटना घडल्यास त्यास सभागृह जबाबदार राहील काम बंद ठेवण्यात यावे. जबाबदारी कर्मचारी यांचेवर टाकण्यात यावी. शहरातील चार मुलांचा मृत्यु झालेला आहे.

श्री.त्रिंबक तुपे :नागरीकांसाठी विषय चांगला आहे. काम होईपर्यंत सरोवर बंद ठेवण्यात यावे. महानगरपालिकेचे वास्तु चांगल्या टिकण्यासाठी मुलांसाठी आवश्यक भाव वाढ सूचविण्यात आले आहे. त्याचा विचार करता 30 रूपयांची वाढ सूचविली आहे ती 20 रूपये वाढ करण्यात यावी. आणि 10 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांसाठी 10 रूपयांच्या ऐवजी 20 रूपये करण्यात यावे.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार लहान मुले खेळताना सरोवरातील टेकडीवरून उतारावर घसरून खाली येतात. त्यामुळे पाण्यात पडून अपघात होऊ शकतो व जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात स.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. जिवितहानी टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सरोवराच्या काठावर रेलींग (कठडा) उभारण्यात यावे. जेणेकरून अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचे बांधकाम होईपर्यंत सरोवर बंद ठेवण्यात यावे. प्रवेश शुल्क 30 रूपये ऐवजी 20 रूपये प्रति व्यक्ती करण्यास तसेच मनपा शालेय विद्यार्थ्यांना सवलत देण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स.सदस्यांच्या भावना विचारात घेता लहान मुले खेळताना सरोवरातील टेकडीवरून उतारावर घसरून खाली येतात. त्यामुळे पाण्यात पडून अपघात होऊ शकतो व जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात स.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. जिवितहानी टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सरोवराच्या काठावर रेलींग (कठडा) उभारण्यात यावे. जेणेकरून अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचे बांधकाम होईपर्यंत सरोवर बंद ठेवण्यात यावे. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणेसाठी डॉ.सलीम अली सरोवरामध्ये येणाऱ्या नागरीक/पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क हे रूपये 10/- ऐवजी रूपये 20/- (वीस रूपये) प्रति व्यक्ती व लहान मुलांसाठी (10 वर्षापेक्षा कमी वय) प्रत्येकी रूपये 10/- असे प्रवेश शुल्क आकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच मनपा शालेय विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी तिकीटदरामध्ये सवलत द्यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 50 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती काझी निशात अंजुम सह शिक्षिका केंद्रीय प्राथमिक शाळा इंदिरानगर, बायजीपुरा शिक्षण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी या कार्यालयास दिनांक 05/02/2014 रोजी विनंती अर्जाद्वारे त्यांचेवर सिग्मा हॉस्पीटल औरंगाबाद या ठिकाणी कर्करोगावरील उपचार सुरू असून त्या उपचारार्थ त्यांना आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती कार्यालयामार्फत करण्यात यावी. अशी मागणी केली आहे.

अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात आलेली असून त्यांना कर्करोगाचे उपचारार्थ एकुण रक्कम रू.4,35,899/- इतका खर्च आलेला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.16442/- वजा जाता रू.4,19,457/- शिल्लक राहते. शिल्लक रकमेच्या 90 % रक्कम रू.3,77,511/- इतकी होते.

एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.21795/- ही म.न.पा. फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.3,55,716/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार घेतलेले सिग्मा रूग्णालय, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरचा प्रस्ताव आरोब्य विभाग महानगरपालिका औरंगाबाद मार्फत पडताळणी करून वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदर वैद्यकीय प्रतिपुर्ती करावयाची र.रू.3,55,716/- असून ही रक्कम रू.2,00,000/- पेक्षा जास्त असल्याने ती संबंधीतास अदा करणेसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

करिता रक्कम रू.3,55,716/- वैद्यकीय प्रतिपुर्ती रक्कम श्रीमती काझी निशात अंजूम सहशिक्षिका के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करणे साठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 50 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती काझी निशात अंजुम सह शिक्षिका केंद्रीय प्राथमिक शाळा इंदिरानगर, बायजीपुरा शिक्षण विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचेवर सिग्मा हॉस्पीटल औरंगाबाद या ठिकाणी कर्करोगावरील उपचार सुरू असून त्या उपचारार्थ त्यांना आलेल्या खर्चाची अनुज्ञेय रक्कम रू.3,77,511/- मधुन एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.21795/- ही म.न.पा. फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.3,55,716/- संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 51 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.हरिभाऊ पुंडलिक पवार, कनिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांनी त्यांची आई सौ.सुमनबाई पुंडलिक पवार यांच्या कर्करोग (Breast Cancer) या आजारपणावर कोडलिकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद येथे घेतले आहे. श्री.हरिभाऊ पवार, कनिष्ठ लिपीक यांनी त्यांच्या आईच्या व वडीलांच्या आजारपणावर उपचारासाठी केलेल्या वैद्यकीय देयकास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देवून रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

01. प्रथमतः संबंधीतास त्यांच्या आईच्या आजारपणावर उपचार घेण्यासाठी रू.1,50,000/- (अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार मात्र) अग्रिम मंजूर करून समायोजन करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

02. संबंधीताने सदर अग्रिमाचे समायोजन करण्यासाठी सादर केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.1,24,999/- च्या 90% रक्कम रू.1,12,499/- (अक्षरी रू.एक लाख बारा हजार चारशे नव्याण्णव मात्र) पैकी 5% रक्कम रू.8,885/- (अक्षरी रू.आठ हजार आठशे पंच्याऐंशी मात्र) (एकुण दाखल केलेले देयके रक्कम रू.1,77,698/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,03,614/- (अक्षरी रू.एक लाख तीन हजार सहाशे चौदा मात्र) अदा करण्यास मंजुरी देण्यात आली.

03. तसेच श्री.एच.पी.पवार, कनिष्ठ लिपीक यांनी वडीलांच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.68,687/- च्या 90% रक्कम रू.61,818/- (अक्षरी रू.एकसष्ट हजार आठशे अठरा मात्र) पैकी 5% रक्कम रू.5,218/- (अक्षरी रू.पाच हजार दोनशे अठरा मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.1,04,343/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.56,600/- (अक्षरी रू.छप्पन हजार सहाशे मात्र) अदा करण्याबाबत मंजुरी देण्यात आली.

04. त्यानुषंगाने संबंधीतास मंजूर करण्यात आलेले रू.1,03,614/- व रू.56,600/- असे एकूण रू.1,60,214/- मधून अग्रिम रक्कम रू.1,50,000/- वजा करून सदर रकमेचे समायोजन करून उर्वरीत फरकाची रक्कम रू.10,214/- (अक्षरी दहा हजार दोनशे चौदा मात्र) अदा करण्यात आलेले आहे.

05. तथापी संबंधीताने आईच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.1,59,297/- च्या 90% रक्कम रू.1,43,367/- (अक्षरी रू.एक लाख त्रेचाळीस हजार तीनशे सदुसष्ट मात्र) पैकी 5% रक्कम रू.7,976/- (अक्षरी रू.सात हजार नऊशे शहात्तर मात्र) (एकुण दाखल केलेले देयके रक्कम रू.1,59,297/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,35,391/- (अक्षरी रू.एक लाख पस्तीस हजार तीनशे एक्यान्नव मात्र) अदा करण्यात आलेले आहे.

06. तसेच संबंधीताने पुन्हा आईच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.1,79,280/- च्या 90% रक्कम रू.1,61,352/- (अक्षरी रू.एक लाख एकसष्ठ हजार तीनशे बावन्न मात्र) पैकी 5% रक्कम रू.10,179/- (अक्षरी रू.दहा हजार एकशे एकोणऐंशी मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.2,03,82/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,51,173/- (अक्षरी रू.एक लाख एक्कावन्न हजार एकशे त्र्याहत्तर मात्र) अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी संबंधीतास सदरील रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

करीता संबंधीतास पुर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रू.1,03,614 + रू.56,600/- + रू.1,35,391/- व संबंधीतास अदा करावयाचे रू.1,51,173/- असे एकुण रू.4,46,778/- या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 51 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.हरिभाऊ पुंडलिक पवार, कनिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांनी त्यांची आई सौ.सुमनबाई पुंडलिक पवार यांच्या कर्करोग (Breast Cancer) या आजारपणावर तसेच वडीलांच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय वैद्यकीय खर्चाच्या रक्कमेपैकी पुर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रू.1,03,614 + रू.56,600/- + रू.1,35,391/- व संबंधीतास अदा करावयाचे रू.1,51,173/- असे एकुण रू.4,46,778/- या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे रक्कम रू.1,51,173/- संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 52 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या पडेगाव येथील कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्प उभारणीचे कामासाठी केंद्र शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली विभागामार्फत पत्र जा.क्र./30-117/2011 (कत्तलखाने) दिनांक 17/01/2014 रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. आणि मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.454 दिनांक 16/01/2014 ने मंजूर केलेला आहे. या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचे सहाय्याने प्रकल्पासाठी स्थानिक तसेच राज्यस्तरीय व देशपातळीवर वृत्तपत्रामध्ये आणि इंटरनेटवर निविदेस प्रसिध्द देण्यात येऊन ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या.

या कामासाठी ई-निविदा विभागामार्फत RFQ आणि RFP मागविले असता निविदा पूर्व बैठकीसाठी 06 निविदा विक्री झाल्या.

त्यापैकी ई-निविदेद्वारे 04 निविदा प्रापत झाल्या असून प्राप्त झालेल्या निविदांची तपासणी सर्व निविदाधारका समक्ष समितीने केली आहे.

या 04 निविदा धारकांनी सादर केलेल्या निविदेतील लिफाफा क्रं.1 मधील गुणपत्तापुर्व आणि गुणवत्ता तपासणी केली असता एक निविदा धारक रिच फुड स्टॉक प्रा.लि. (EMD) अनामत रक्कमेपोटी द्यावयाची बँक गॅरटी रूपये 36.5 लक्ष सादर केलेली नसल्याने त्यांना पुढच्या तपासणीसाठी अपात्र ठरविण्यात आले.

उर्वरीत तीन निविदाधारकांची गुणपत्तापुर्व व गुणवत्ता तपासणी करण्यात आली असता निविदा धारक क्रं.4 यांनी निविदेतील महत्वाच्या अटी पैकी एक अट म्हणजेच कत्तलखाना चालविण्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही आणि कारखाना मालकीचा पुरावा सादर केलेला नसल्याने ते या फेरीत बाद झाले.

अशा प्रकारे प्राप्त चार निविदाधारकापैकी

01. श्री.जावेद फत्ते मोहमंद चौधरी, भागीदारी संस्था (CONSORSTIUM)
02. मे.फ्रेश एन फ्रोजन फुड टेक, भागीदारी संस्था (CONSORSTIUM)

हे उपरोक्त दोनही निविदाधारक पुढील फेरीसाठी पात्र ठरले. पात्र ठरलेल्या दोन्ही निविदाधारकांच्या लिफाफा क्र.2 मधील तांत्रिक व व्यापारी प्रस्तावातील बाबीची निविदेतील कलम क्र.8.1 प्रमाणे तपासणी केली असता प्रत्येक बाबीसाठी दिलेल्या गुणांची बेरीज केली असता संख्या निविदाधारक क्रं.1 यांना 77 गुण आणि निविदाधारक क्र.2 यांना 81 गुण प्राप्त झाले आहेत. निविदेच्या अटी प्रमाणे कमीत कमी 75 गुण असणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील दोन्ही निविदाधारकांना पुढील कार्यवाहीसाठी पात्र ठरविले आहे.

उपरोक्त प्रमाणे दोन्ही निविदाधारकाने सादर केलेल्या व्यापारी प्रस्तावाचा लिफाफा क्र.3 उघडण्यात आला.

| Sr. No. | Firm or Consortium | Financial bid proposal | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Additional Premium to AMC in Rs, if any | | Amount of Grant requested In Rs. | |
| | | Figures | Words | Figures | Words |
| 01. | M/s A 1 Quresh Exports, A1 Fatah Global and Mr.Javed Fateh Mohammad Choudhari Consortium | Rs.2,60,00,000/- | Rs two Crores Sixty lakhs only | N/a | N/a |
| 02. | M/s Fresh & Frozen Foodtech, M/s Diamant Infrastructure Ltd. and Shri Ahmed Abdul Nayeem Consortium | N/a | N/a | Rs 1/- only | Rs One only. |

वरीलप्रमाणे निविदाधारक क्र.1 म्हणजेच श्री.जावेद फत्ते मोहमंद चौधरी यांची निविदा सर्व अटी शर्ती पुर्ण करीत असल्याने आणि केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान न घेता ते महानगरपालिकेस रक्कम रूपये 2.60 कोटी रूपये काम सुरू करण्यापूर्वी देणार आहेत, आणि त्याचप्रमाणे प्रतिवर्षी रक्कम रूपये 2.25 कोटी आणि त्यात दर तीन वर्षांनी नियमाप्रमाणे वाढ होणारी रक्कम देणार असल्याने व हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या फायद्याचा असल्या कारणाने मान्य करण्यास समितीने सहमती दिली आहे.

करीता सर्वात फायदेशीर श्री.जावेद फत्ते मोहमंद चौधरी यांची निविदा आणि त्या संदर्भाने केंद्र शासन व राज्य शासनाकडे पुढील कार्यवाही प्रशासनाने करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळचे सर्व विषय दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या पडेगाव येथील कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्प उभारणीचे कामासाठी प्राप्त निविदांपैकी पात्र ठरलेल्या निविदाधारकांपैकी श्री.जावेद फत्ते मोहमंद चौधरी यांची निविदा सर्व अटी शर्ती पुर्ण करीत असल्याने आणि केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान न घेता ते महानगरपालिकेस रक्कम रूपये 2.60 कोटी रूपये काम सुरू करण्यापूर्वी आणि प्रतिवर्षी रक्कम रूपये 2.25 कोटी आणि त्यात दर तीन वर्षांनी नियमाप्रमाणे वाढ होणारी रक्कम देणार असल्याने हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या हिताचा असून सर्वात फायदेशीर श्री.जावेद फत्ते मोहमंद चौधरी यांची निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येत. त्याचप्रमाणे या प्रकल्पा संदर्भाने केंद्र शासन व राज्य शासनाकडे प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 53 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथील मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाचे अंतर्गत व बाह्य सजावटीच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 4,78,61,500/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.566 दिनांक 10/07/2014 अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या परंतु दोन्ही वेळेस यास प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्या वेळेस निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% जास्त |
| 02. | शलाका इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त |
| 03. | मे.मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | तांत्रिक कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |

वरील प्राप्त निविदांपैकी मे.मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची तांत्रिक कागदपत्राची पूर्तना न केल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही. उर्वरीत दोन निविदा उघडण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% जास्त दराची मे.ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची निविदा आहे.

तरी मे.ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाचे अंतर्गत व बाह्य सजावटीच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% जास्त दराचे निविदाधारक मे.ग्राफिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून सदर काम करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 54 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय परीसरातील क्षितीज सजावटीचे/ सुशोभिकरण (LandScaping) ची कामे करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2013-14 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.55,39,700.00 चे तयार करण्यात आलेले होते.सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 630 दिनांक 11/08/2014 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली होती.

मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीन्वये सदरील कामाची ई-निविदा क्र.24-14-83 अन्वये काढण्यात आली असता निविदा विक्री दिनांक 19/08/2014 ते स्विकृती दिनांक 20/08/2014 पर्यंत एकुण 3 निविदा विक्री व स्विकृत झालेल्या होत्या.

01. मे.अे.एस.कंन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.95 टक्के जास्त दराने.
02. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.16 टक्के जास्त दराने.
03. प्रभाकर गणपत मोहिते - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.00 टक्के जास्त दराने.

उक्त प्राप्त विवरणाचे अवलोकन केले असता सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.95 टक्के जास्त दराची निविदा मे.अे.एस.कंन्स्ट्रक्शन यांची आहे.

करीता मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय परिसरातील क्षितीज सजावटीचे/सुशोभिकरण (Land Scaping) चे काम मक्तेदार मे.अे.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.95 टक्के जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ तथापी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय परीसरातील क्षितीज सजावटीचे/ सुशोभिकरण (LandScaping) ची कामे करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.95% जास्त दराची मे.अे.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 55 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती समता शिवाजीराव वांगे (लोंढे), सहाय्यक ग्रंथपाल खडकेश्वर वाचनालय यांनी त्यांच्या स्वतःच्या सासुच्या k/c/o HT with Acute anti wall Myocardial Infarction with Single Vessel Disease with Coronary Angioplasty with PTCA to Vap (तीव्र हृदयरोग) यावर उपचारासाठी एकुण रू.2,65,265/- (रूपये दोन लक्ष पासष्ट हजार दोनशे पासष्ट केवळ) इतका खर्च केला असून त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाचे एकुण देयक रू.2,65,265/- त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.2,49,625/- च्या 90% रक्कम रू.2,24,663/- (अक्षरी रू.दोन लक्ष चोवीस हजार सहाशे त्रेसष्ट केवळ) त्यापैकी एकत्रीत दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.13,263/- (अक्षरी रूपये तेरा हजार दोनशे त्रेसष्ट केवळ) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,11,400/- (अक्षरी रू.दोन लक्ष अकरा हजार चारशे केवळ) संबंधीतास अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता श्रीमती समता शिवाजीराव वांगे (लोंढे) यांनी त्यांच्या स्वतःच्या सासुच्या वैद्यकीय खर्चासाठी केलेला उपरोक्त प्रमाणे मान्य झालेला रू.2,11,400/- (अक्षरी रूपये दोन लक्ष अकरा हजार चारशे केवळ) खर्च संबंधीतास अदा करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती समता शिवाजीराव वांगे (लोंढे), सहाय्यक ग्रंथपाल खडकेश्वर वाचनालय यांनी त्यांच्या स्वतःच्या सासुच्या k/c/o HT with Acute anti wall Myocardial Infarction with Single Vessel Disease with Coronary Angioplasty with PTCA to Vap (तीव्र हृदयरोग) या आजारावरील उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चापैकी अनुज्ञेय रक्कम रू.2,24,663/- (अक्षरी रू.दोन लक्ष चोवीस हजार सहाशे त्रेसष्ट केवळ) पैकी एकत्रीत देयकाच्या 5% रक्कम रू.13,263/- (अक्षरी रूपये तेरा हजार दोनशे त्रेसष्ट केवळ) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,11,400/- (अक्षरी रू.दोन लक्ष अकरा हजार चारशे केवळ) संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 56 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 3 टिप्पर्स व 12 ट्रॅक्टर्स ही खाजगी वाहने सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यासाठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.44 दिनांक 08/08/2014 नुसार रक्कम रूपये 49,11,660/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी तीन निविदाधारकांनी तांत्रिक निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता केली आहे. त्याप्रमाणे या तीन निविदाधारकांची व्यापारी निविदा उघडण्यात आली असुन प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्रतिदिन प्रती टिप्पर दर | प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर दर |
|---|---|---|---|
| 01. | मे. के. ए. घुगे | रूपये 3387/- | रूपये 1487/- |
| 02. | मे.जय अंबिका सुशिक्षीत बेरोजगार सहकारी सेवा संस्था | रूपये 3295/- | रूपये 1595/- |
| 03. | मे गुरूदत्त ट्रान्सपोर्ट | रूपये 3699/- | रूपये 2259/- |

प्राप्त झालेल्या निविदेमध्ये टिप्पर करीता तुलनात्मकदृष्ट्या मे.जय अंबिका सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांचे दर सर्वात कमी असुन, ट्रॅक्टर करीता तुलनात्मकदृष्ट्या मे.के.ए.घुगे यांचे दर सर्वात कमी आहेत. टिप्पर व ट्रॅक्टरसाठी प्राप्त सर्वात कमीचे दर हे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा कमी असून खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | वाहन | अ.प. दर | प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| 01. | मे. के. ए. घुगे | ट्रॅक्टर | 1699/- | 1487/- |
| 02. | मे.जय अंबिका सुशिक्षीत बेरोजगार सहकारी सेवा संस्था | टिप्पर | 3699/- | 3295/- |

जाहीर निविदेद्वारे प्राप्त झालेले दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी आहेत. त्यामुळे मे. के.ए.घुगे यांचे ट्रॅक्टरसाठी प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1487/- आणि मे. जय अंबिका सुशिक्षीत बेरोजगार सहकारी सेवा संस्था यांचे टिप्परसाठी प्रतिदिन प्रति टिप्पर रूपये 3295/- दर मंजुर करणे योग्य होईल.

करीता ट्रॅक्टरसाठी मे. के.ए.घुगे आणि टिप्परसाठी मे जय अंबिका सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांचे उपरोक्त प्रमाणे दरास मान्यता मिळणे संबंधी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी 3 टिप्पर्स व 12 ट्रॅक्टर्स ही खाजगी वाहने सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांनुसार टिप्पर्स व ट्रॅक्टर्स करीता सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.के.ए.घुगे यांचे ट्रॅक्टरसाठी प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1487/- आणि मे.जय अंबिका सुशिक्षीत बेरोजगार सहकारी सेवा संस्था यांचे टिप्परसाठी प्रतिदिन प्रति टिप्पर रूपये 3295/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 57 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे 100 दलली व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहेत. जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी तुरटी ग्रेड-1 व पॉलि ॲल्युमिनिअम क्लोराईड या रसायनांचा वापर करण्यात येतो. याकरीता 60% तुरटी ग्रेड-1 व 40% पॉली ॲल्युमिनिअम क्लोराईडचा वापर केला जातो. 15 पी.पी.एम. प्रतिदिन सर्वसाधारण मात्रा गृहित धरता व पावसाळ्याच्या दिवसात तसेच आणीबाणीच्या प्रसंगी 30 पी.पी.एम. इतकी मात्रा गृहित धरता 820 मे. टन वार्षिक तुरटी ग्रेड-1 फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे लागणार आहे.

या पुरवठ्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2013-14 च्या दरसुचीनुसार रूपये 69,70,000/- किमंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सन 2014-15 च्या अर्थसंकल्पामध्ये समांतर जलवाहीनीसाठी AOSG करीता रूपये 63 कोटी रकमेची तरतुद असून या पुरवठ्याचा खर्च उपरोक्त तरतुदीमधुन प्रस्तावित आहे. या अंदाजपत्रकास विषय क्र.542 दिनांक 20/05/2014 अन्वये मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

वार्षीक तुरटी ग्रेड-1 या रसायनाचा पुरवठा करण्यासंबंधीत ई-निविदा विभागामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. या कामासाठी दोन वेळेस मुदतवाढ देऊन केलेल्या निविदा प्रक्रिये अंतर्गत एकुण दोन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

01. मे.सार्क केमीकल्स प्रा.लि. औरंगाबाद - रूपये 9300/- प्र. मे. टन
02. मे.ओम प्लॅस्टीक औरंगाबाद - निविदा अटींची पुर्तता न केल्याने दरपत्रक उघडले नाही.

प्राप्त निविदांपैकी मे.सार्क केमीकल्स प्रा.लि. औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रूपये 9300/- प्र.मे. टन असे आहेत. या दराने खरेदी केल्यास पुरवठ्या करीता खालीलप्रमाणे खर्च येईल.

820 मे. टन x रूपये 9300/- प्र. मे. टन = रूपये 76,26,000/-

तुलनात्मकदृष्ट्या निविदेतील प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा 9.41% जास्त आहेत. तसेच सद्यस्थितीत पुरवठा होत असलेल्या दरांपेक्षा (रूपये 8900/- प्रती मे. टन) 4.49% जास्त आहे.

करीता उपरोक्त दरांनुसार मे. सार्क केमीकल्स प्रा.लि. औरंगाबाद यांची तुरटी ग्रेड-1 या रसायनाच्या वार्षिक पुरवठ्याची रूपये 9300/- प्र. मे. टन या दराची व रूपये 76,26,000/- खर्चाची निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथील 100 दलली व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड-1 या रसायनाचा पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सार्क केमीकल्स प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून वार्षिक पुरवठ्याची रूपये 9300/- प्र. मे. टन या दराची व रूपये 76,26,000/- खर्चाची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 58 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.95 अंतर्गत सोनार गल्ली नंदादीप सोसायटी पदमपुरा भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,95,320/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा दि.11/02/2014 ठराव क्रमांक 150 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेनुसार सदर कामाकरीता ई-निविदा विभागातर्फे जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 03 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 03 तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झाल्याचा अहवाल ई निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01. | मे.अरोरा कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.16% कमी दराने |
| 02. | मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.00% जास्त दराने |
| 03. | मे.अमन कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.00% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.16% कमी दराची निविदा मे.अरोरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली आहे. सदरील प्राप्त निविदा दराच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस करण्यात येत आहे.

करीता, प्रस्तावित कामाची प्राप्त निविदेतील सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.16% कमी दराची निविदा मे.अरोरा कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.95 अंतर्गत सोनार गल्ली नंदादीप सोसायटी पदमपुरा भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.16% सर्वात कमी दराची मे.अरोरा कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन 2014-15 करिता शहरातील विविध ठिकाणी वाहनतळासाठी जाहिर निविदा सूचनाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता त्यासाठी पैठणगेट येथील वाहतुक बेटामधील वाहनतळासाठी खालीलप्रमाणे नऊ व संत एकनाथ रंगमंदिर लगतचे तळघरातील वाहनतळासाठी खालीलप्रमाणे दोन निविदा तसेच सलीम अली उद्यान वाहनतळासाठी खालीलप्रमाणे फक्त एक निविदा प्राप्त झाली आहे.

| **पैठणगेट वाहतुक बेटामधील वाहनतळ** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **एजन्सी धारकाचे नाव** | **निविदा दर प्रतिमाह** | **शेरा** |
| 01. | विनोद सुभाष बेदमुथा | रू.18,460/- | I (1) |
| 02. | नारायण म्हाळाजी जाधव | रू.12,500/- | II (2) |
| 03. | राहुल राजु गिरधारे | रू.11,150/- | III (3) |
| 04. | संतोष राजु कांबळे | रू.11,000/- | IV (4) |
| 05. | बालाजीसिंग किशनसिंग ठाकुर | रू.10,111/- | V (5) |
| 06. | अब्दुल कादर अब्दुल करीम | रू.8000/- | VI (6) |
| 07. | हरिशकुमार सुभाषलाल पालीवाल | रू.7500/- | VII (7) |
| 08. | सुभाष लक्ष्मण जाटवे | रू.7000/- | VIII (8) |
| 09. | विलास शंकर त्रिभुवन | रू.6500/- | IX (9) |
| **संत एकनाथ रंगमंदिर लगतचे तळ घरातील वाहनतळ** | | | |
| **अ.क्र.** | **एजन्सी धारकाचे नाव** | **निविदा दर प्रतिमाह** | **शेरा** |
| 01. | विलास शंकर त्रिभुवन | रू. 8,555/- | I (1) |
| 02. | दिपक किशोर मार्तेकर | रू.3,000/- | II (2) |
| **सलीम अली उद्यान वाहनतळ** | | | |
| **अ.क्र.** | **एजन्सी धारकाचे नाव** | **निविदा दर प्रतिमाह** | **शेरा** |
| 01. | विलास शंकर त्रिभुवन | रू. 5,555/- | |

01. त्यापैकी पैठणगेट वाहतुक बेटामधील वाहनतळासाठी सर्वात जास्त दराचे निविदा श्री.विनोद सुभाष बेदमुथा यांनी प्रतिमाह रू.18,460/- देण्यासाठी निविदा भरली आहे. हा दर सर्वात जास्त असल्यामुळे मा.स्थायी समितीची मान्यता होणे आहे.
02. संत एकनाथ रंगमंदिर लगतचे तळ घरातील वाहनतळासाठी श्री.विलास शंकर त्रिभुवन यांनी प्रतिमाह रू.8,555/- देण्यासाठी निविदा भरली आहे. हा दर सर्वात जास्त असल्यामुळे मा.स्थायी समितीची मान्यता होणे आहे.
03. सलीम अली उद्यान येथील वाहनतळासाठी श्री.विलास शंकर त्रिभुवन यांनी प्रतिमाह रू.5,555/- देण्यासाठी निविदा भरली आहे. हा दर असल्यामुळे मा.स्थायी समितीची मान्यता होणे आहे.

वरिल तिन्हीही ठिकाणावरील वाहनतळासाठी जास्तीचा दर अनुक्रमे रक्कम रू.18,460/- व रू.8,555/- व रू.5,555/- प्रतिमाह या दराचा असल्याने उक्त दरास नेहमीच्या अटी / शर्तीस अधिन राहुन वाहनतळ शुल्क व वसुलीकरीता संबंधीत उच्च दर निविदा धारकास देण्यात येतील. करिता मा.स्थायी समितीची मान्यता होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन 2014-15 करिता शहरातील पैठणगेट येथील वाहतुक बेटामधील वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.विनोद सुभाष बेदमुथा यांना प्रतिमाह रू.18,460/- प्रमाणे वाहनतळ शुल्क वसुलीकरीता देण्यास व संत एकनाथ रंगमंदिर लगतचे तळघरातील वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.विलास शंकर त्रिभुवन यांना रू.8,555/- तसेच सलीम अली उद्यान येथील वाहनतळासाठी प्राप्त एकच निविदाधारक श्री.विलास शंकर त्रिभुवन यांना प्रतिमाह रू.5,555/- प्रमाणे नेहमीच्या अटी / शर्तीस अधिन राहुन वाहनतळ शुल्क व वसुलीकरीता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिलीयंट किडस् स्कुल, जवाहर कॉलनी रोड, विष्णुनगर औरंगाबाद यांना मो.लिमयेवाडी, मित्रनगर येथील खुली जागा विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ठराविक वेळेत उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी संबंधीत संस्थेने केलेली आहे. खुल्या जागेचा उपयोग त्या परिसरातील नागरीकांना, त्यांच्या मुलांना खेळण्यासाठी व्हावा. असा उद्देश असतो. याच उद्देशाने उपरोक्त संस्थेने शालेय विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी सदर जागा मागितलेली आहे.

संस्थेच्या मागणीप्रमाणे ब्रिलीयंट किडस् स्कुल या संस्थेस या विद्यार्थ्यांच्या खेळासाठी ठराविक वेळेमध्ये लिमयेवाडी, मित्रनगर येथील खुली जागा विनामुल्य वापरण्यास परवानगी द्यावी. करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रवि कावडे अनुमोदक :अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्रिलीयंट किडस् स्कुल, जवाहर कॉलनी रोड, विष्णुनगर औरंगाबाद यांना मो.लिमयेवाडी, मित्रनगर येथील खुली जागा विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ठराविक वेळेत उपलब्ध करून देण्याची संबंधीत संस्थेने केलेल्या मागणीनुसार सदर मैदान विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ठराविक वेळेमध्ये विनामुल्य वापरण्यास परवानगी देण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 61 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.39 अंतर्गत कुंवारफल्ली येथे रहिवासी क्षेत्रात 15-20 वर्षापूर्वी पाणपोई बांधण्यात आलेली आहे. परंतु सदर पाणपोई विनावापर पडून आहे. तसेच त्याठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. त्यामुळे या परिसरातील नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या भागातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात सध्या डेंग्यु या आजाराची मोठी साथ चालु आहे.

तरी सदरील ठिकाणी असलेली पाणपोई निष्काषीत करण्यात यावी. करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : जगदिश सिध्द अनुमोदक : अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.39 अंतर्गत कुंवारफल्ली येथे रहिवासी क्षेत्रात 15-20 वर्षापूर्वी बांधण्यात आलेली पाणपोई विनावापर पडून असल्यामुळे, सदर पाणपोई निष्काषीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 62 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.39 अंतर्गत नाईकवाडा-मोतीकारंजा येथे रहिवासी क्षेत्रात 15-20 वर्षापूर्वी नागरीकांसाठी शौच्छालय बांधण्यात आलेले आहे. परंतु सदर शौच्छालयाची दुरावस्था झाली असून मोडक्या-तोडक्या अवस्थेत आहे. त्यामुळे या ठिकाणी माहिला वापर करू शकत

नाही. तसेच आजुबाजूस घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. त्यामुळे या परिसरातील नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या भागातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात सध्या डेंग्यु या आजाराची मोठी साथ चालु आहे.

तरी सदरील ठिकाणी असलेली शौच्छालय निष्काषीत करण्यात यावे व त्याठिकाणी नविन शौच्छालय बांधण्यात यावे. करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : जगदिश सिध्द अनुमोदक : अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.39 अंतर्गत नाईकवाडा-मोतीकारंजा येथे रहिवासी क्षेत्रात 15-20 वर्षापूर्वी नागरीकांसाठी बांधण्यात आलेल्या शौच्छालयाची दुरावस्था झालेली असल्यामुळे, सदर शौच्छालय निष्काषीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 63 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला एन-9 एम-2 सिडको येथील कम्युनिटी हॉल महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉल अध्यक्ष, जनहित बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरील हॉलचे क्षेत्रफळ 218 चौ.मी. (टीन शेड) असून सन 2014 च्या सिध्द शिघ्र गणकानुसारचे भाडे रू.45210/- प्रतिमाह (इतर कर वेगळे) एवढे होते. तथापी सदरील हॉलचे बांधकाम हे 15 वर्षापूर्वीचे असून महानगरपालिकेच्या मंजुर धोरणानुसार मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील पारीत झालेल्या ठराव क्र.216 अन्वये ज्या हॉलचे बांधकाम पंधरा वर्ष किंवा त्याहुन जास्त कालावधीचे असल्यास मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्स्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% ते 20% दराआधारे भाडे निश्चित करून भाडेतत्वावर देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे.

मा.स्थायी समितीच्या वर नमुद केलेल्या धोरणानुसार अध्यक्ष, जनहित बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेस सदरील हॉल महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहून तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्स्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दराआधारे भाडे निश्चित करून पाच अधिक पाच वर्ष कालावधीसाठी देण्यात यावे. पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष असे एकूण दहा वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला एन-9 एम-2 सिडको येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील कम्युनिटी हॉल अध्यक्ष, जनहित बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केल्यानुसार तसेच मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील पारीत झालेल्या ठराव क्र.216 अन्वये ठरलेल्या धोरणाप्रमाणे मनपाच्या हिताच्या दृष्टीकोनातून सदर हॉलचे मेंन्स्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% दराआधारे भाडे निश्चित करून अध्यक्ष, जनहित बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांना पाच + पाच वर्षासाठी देण्यास, पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 64 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 28/2/2014 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.216 अन्वये मित्रनगर व भोईवाडा, नेहरू पॅलेस येथील पंधरा वर्षापुर्वीचे बांधकाम असलेले महानगरपालिकेच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल/इमारत यांचे मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दरा आधारे भाडे निश्चित करून अनुक्रमे सचिव, माऊली महिला बचत गट व युवा एकता मित्रमंडळ सामाजिक संस्था या संस्थांना दीर्घ मुदतीसाठी (एकोणतीस वर्ष) भाडेतत्वावर देण्यासाठी ठराव पारीत करण्यात आला होता. तथापी सदरील एकोणतीस वर्षाऐवजी दुरूस्ती करून दहा वर्षासाठी भाडेतत्वावर देण्याकरीता पाच + पाच वर्षासाठी तसेच पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यासाठी दुरूस्ती प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

सुचकः काशीनाथ हरीभाऊ कोकाटे(सदस्य स्थायी समिती) अनुमोदक :रवि साहेबराव कावडे (सदस्य स्थायी समिती)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक 28/2/2014 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.216 अन्वये मित्रनगर व भोईवाडा, नेहरू पॅलेस येथील पंधरा वर्षापुर्वीचे बांधकाम असलेले महानगरपालिकेच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल/इमारत यांचे मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दरा आधारे भाडे निश्चित करून अनुक्रमे सचिव, माऊली महिला बचत गट व युवा एकता मित्रमंडळ सामाजिक संस्था या संस्थांना दीर्घ मुदतीसाठी (एकोणतीस वर्ष) भाडेतत्वावर देण्यासाठी पारीत करण्यात आलेल्या ठरावात एकोणतीस वर्षाऐवजी दुरूस्ती करून दहा वर्षासाठी भाडेतत्वावर देण्याकरीता पाच+पाच वर्षासाठी तसेच पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यासाठीच्या दुरूस्ती प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 65 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.25 सिडको N-7 येथील सेक्टर C ते म्हाडा R-28, म्हाडा G-1, आणि सेक्टर C-1 व इतर रस्त्यांचे मजबुतीकरण व पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम या विभागाच्या सन 2011-2012 च्या दरसूची (DSR) नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.26,23,400/- चे होत आहे. सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत करणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्यात येते.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.26,23,400/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 सिडको N-7 येथील सेक्टर C ते म्हाडा R-28,म्हाडा G-1, आणि सेक्टर C-1 व इतर रस्त्यांचे मजबुतीकरण व पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.26,23,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 66 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.60 समतानगर भागात रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2010-11 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रूपये 19,88,803/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता यापुर्वी प्राप्त झाल्यानुसार सदर कामाकरीता ई

निविदा विभागातर्फे जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 02 निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.00% जास्त दराच्या मे.ए.एस. कंस्ट्रक्शन यांचे निविदेस प्राप्त प्रशासकीय मान्यतेनुसार संबंधीत कंत्राटदारास नियमानुसार कार्यादेश देण्यात आले होते. सदरील काम प्रत्यक्ष करतांना काही वाढीव काम करणे आवश्यक असल्याने प्रस्तावित कामात रक्कम रूपये 10.00 लक्षची वाढ झालेली आहे. प्रस्तावित वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये 28,91,088/- चे करण्यात आले आहे. सदरील वाढीव रक्कमेचे रूपये 9,02,285/- चे काम मुळ कामाचे गुत्तेदार मे.ए.एस. कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ शिफारस करण्यात येते.

करीता उपरोक्तनुसार सदरील कामाचे मुळ गुत्तेदार मे.ए.एस. कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.60 समतानगर भागात रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामामध्ये प्रत्यक्ष काम करतांना काही वाढीव काम करणे आवश्यक असल्याने प्रस्तावित वाढीव कामाचे सुधारीत रक्कम रूपये 28,91,088/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील वाढीव रक्कमे रूपये 9,02,285/- चे काम मुळ कामाचे गुत्तेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**प्रमोद का. खोब्रागडे,**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद